DISTRICT MAGISTRATE OSMANABAD

# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

(उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301

Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26

दिनांक:- 05/04/2020.

**आदेश**

ज्याअर्थी एक सप्ताहापूर्वी मरकज मशीद निजामुद्दीन दिल्ली येथील घटनेनंतर सोशल मिडीया, व्हाट्सअॅप ग्रुप (Whatsapp Group) वर विविध प्रकारचे सांप्रदायिक भडकाऊ मेसेज/संदेश हे हिंदु/मुस्लीम ग्रुप मध्ये प्रसारीत होत असल्यामुळे जिल्ह्यामध्ये सांप्रदायिक घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. पोलीस विभागातर्फे अशा प्राप्त होणा-या मेसेज/संदेश वर गुन्हे दाखल करुन आरोपी विरुद्ध कार्यवाही करण्यात आली आहे.

ज्याअर्थी असे निदर्शनास आले आहे की, जातीय स्वरुपाचे व्हॉट्सअॅप ग्रुप (Whatsapp Group) वर धार्मिक/सांप्रादायिक तेढ निर्माण करणारे मेसेज/संदेश पाठविले जातात. त्यामुळे जिल्ह्यामध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु शकतो.

ज्याअर्थी जिल्ह्यामध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरिता तात्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. अशा उपाययोजना करण्याकरीता फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 (1)(3) अन्वये उस्मानाबाद जिल्ह्यात व्हॉट्सअॅप ग्रुपचे अॅडमीन (Whatsapp Group) यांना उद्देशून आदेश काढणे आवश्यक असल्याबाबत माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हादंडाधिकारी, उस्मानाबाद फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 (1)(3) अन्वये मला प्राप्त अधिकारांनुसार दिनांक 05.04.2020 रोजी पासून उस्मानाबाद जिल्ह्यात पुढील प्रमाणे आदेश लागू करीत आहे.

1. उस्मानाबाद जिल्ह्यातील व्हॉट्सअॅप ग्रुप (Whatsapp Group) चे अॅडमीन हे त्यांच्या व्हॉट्सअॅप ग्रुप (Whatsapp Group) वर फक्त अॅडमीन हेच मेसेज/संदेश पाठवू शकतील.
2. व्हॉट्सअॅप ग्रुप (Whatsapp Group) चा इतर कोणताही सदस्य व्हॉट्सअॅप ग्रुप (Whatsapp Group) वर मेसेज/संदेश पाठवु शकणार नाही.
3. यानंतर जर व्हॉट्सअॅप ग्रुप (Whatsapp Group) वर कोणीही धर्म/धर्मगुरु/धार्मिक स्थळाबाबत मेसेज/संदेश किंवा असा कोणताही संदेश ज्यामुळे समाजांमध्ये/धर्मांमध्ये तेढ निर्माण होवु शकेल असे मेसेज/संदेश प्रसारित करतील अशा व्हॉट्सअॅप ग्रुप (Whatsapp Group) चे अॅडमीन हे गुन्ह्यास पात्र ठरतील. याबाबत त्यांची वैयक्तीक जबाबदारी राहील.
4. यानंतर जर व्हॉट्सअॅप (Whatsapp)/ट्विटर (Twitter)/इन्स्टाग्राम (Instagram) वर कोणीही धर्म/धर्मगुरु/धार्मिक स्थळाबाबत मेसेज/संदेश किंवा असा कोणताही संदेश ज्यामुळे समाजांमध्ये/धर्मांमध्ये तेढ निर्माण होवु शकेल असे मेसेज/संदेश प्रसारित करतील तर असे व्हॉट्सअॅप (Whatsapp)/ट्विटर (Twitter)/इन्स्टाग्राम (Instagram) वापरकर्ते हे गुन्ह्यास पात्र ठरतील. याबाबत त्यांची वैयक्तिक जबाबदारी राहील.

Scanned by CamScanner

5. यानंतर जर फेसबुक ग्रुप/पेज (Facebook Group/Page) वर कोणीही धर्म/धर्मगुरु/धार्मिक स्थळाबाबत मेसेज/संदेश किंवा असा कोणताही संदेश ज्यामुळे समाजांमध्ये/धर्मांमध्ये तेढ निर्माण होवु शकेल असे मेसेज/संदेश प्रसारित करतील तर अशा फेसबुक ग्रुप/पेज (Facebook Group/Page) चे ॲडमीन हे गुन्ह्यास पात्र ठरतील. याबाबत त्यांची वैयक्तिक जबाबदारी राहील.

6. व्हॉट्सॲप (Whatsapp)/ट्विटर (Twitter)/इन्स्टाग्राम (Instagram) वर कोणासही करोना विषाणु (COVID-19) च्या अनुषंगाने चुकीचा व वैज्ञानिक दृष्टीकोन नसलेला मेसेज/संदेश प्रसारित करता येणार नाही. अन्यथा उक्त नमूद मेसेज/संदेश प्रसारित करणारे व्हॉट्सॲप (Whatsapp)/ट्विटर (Twitter)/इन्स्टाग्राम (Instagram) वापरकर्ते, ॲडमीन हे गुन्ह्यास पात्र ठरतील. याबाबत त्यांची वैयक्तिक जबाबदारी राहील.

7. सदरील आदेश हे पूर्णपणे प्रशासकीय कामकाजा करीता उपयोगात आणल्या जाणा-या व्हॉट्सॲप ग्रुप (Whatsapp Group) ला लागू राहणार नाहीत.

सदर चे आदेश आज दिनांक 05.04.2020 रोजी सही शिक्क्यानिशी दिले आहेत.

(दिपा मुधोळ-मुंडे)
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, उस्मानाबाद**

**प्रत:-** 1. मा. अपर मुख्य सचिव, गृह विभाग (विशेष) महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
3. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
4. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.
5. उपविभागीय दंडाधिकारी तथा INSIDENT COMMANDER सर्व जिल्हा उस्मानाबाद यांना आवश्यक कार्यवाहीस्तव.
6. तालुका दंडाधिकारी तथा INSIDENT COMMANDER सर्व जिल्हा उस्मानाबाद यांना आवश्यक कार्यवाहीस्तव.
7. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

5/4/20
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD

Scanned by CamScanner